महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ११ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### 'सखी' केंद्रे कागदातून प्रत्यक्षात कधी येणार?

महिलांवरील अन्याय, हिंसा व अत्याचाराच्या प्रसंगी तातडीने मदत मिळावी, या उद्देशाने सुरू करण्यात आलेली सखी वन स्टॉप केंद्र ही संकल्पना सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. कायदेशीर सल्ला, वैद्यकीय मदत, समुपदेशन आणि सुरक्षिततेचा आधार एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारी ही व्यवस्था अनेक महिलांसाठी दिलासादायक ठरली आहे. ठाणे जिल्ह्यासारख्या वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या भागात आणि गेल्या काही वर्षांत घडलेल्या घटनांचा विचार करता, अतिरिक्त सखी केंद्रांची आवश्यकता ओळखून त्यांना मंजुरी देण्यात आली, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र मंजुरीनंतर प्रत्यक्ष उभारणी आणि अंमलबजावणी यामध्ये होत असलेला विलंब चिंतनास भाग पाडणारा आहे.

महिला व बालविकास विभागाकडून या केंद्रांसाठी आवश्यक असलेली साधने, वाहने आणि मनुष्यबळ वेळेत उपलब्ध न होणे, ही बाब केवळ प्रशासकीय प्रक्रियेचा प्रश्न न राहता महिला सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. संकटात सापडलेल्या महिलेसाठी वेळेवर मदत मिळणे अत्यावश्यक असते आणि त्यासाठी व्यवस्था कार्यरत असणे तितकेच गरजेचे आहे. सखी वन स्टॉप केंद्रे ही केवळ इमारत नसून, ती महिलांसाठी विश्वासाचा आधार आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी समन्वय साधत या केंद्रांच्या उभारणीला गती द्यावी, अशी अपेक्षा आहे. प्रभावी अंमलबजावणी झाली, तर महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हा एक मजबूत पाऊल ठरू शकतो. ठाणे जिल्ह्यासारख्या लोकसंख्येने मोठ्या आणि शहरीकरण वेगाने वाढणाऱ्या जिल्ह्यात महिलांसाठी अशा केंद्रांची गरज अधिक आहे. वाढत्या तक्रारी आणि घटनांच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त सखी केंद्रांना मंजुरी देण्यात आली, ही बाब सकारात्मक असली तरी प्रत्यक्षात ही केंद्रे अद्याप सुरू न होणे ही चिंतेची बाब आहे. महिला सुरक्षेसारखा संवेदनशील विषय केवळ मंजुरीपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. संबंधित विभागांनी समन्वय साधून सखी वन स्टॉप केंद्रांची उभारणी, मनुष्यबळ नियुक्ती आणि आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. वेळेत आणि प्रभावी निर्णय घेतले, तर महिलांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल आणि सुरक्षिततेच्या दिशेने ठोस पाऊल उचलले जाईल, अशी अपेक्षा आहे. ठाणे जिल्ह्यासारख्या वेगाने विस्तारत असलेल्या आणि लोकसंख्येचा ताण वाढलेल्या जिल्ह्यात महिलांवरील तक्रारींची संख्या कमी नाही. अशा पार्श्वभूमीवर अतिरिक्त सखी केंद्रांना मंजुरी देण्यात आली, ही बाब आश्वासक होती. मात्र दोन वर्षांहून अधिक काळ उलटून गेला तरी ही केंद्रे प्रत्यक्षात उभी राहू शकलेली नाहीत, ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे. प्रशासनाच्या फाईल्समध्ये मंजुरी मिळालेली असताना प्रत्यक्षात संकटात सापडलेल्या महिलेला मदतीचा दरवाजा बंद असल्याचे चित्र दिसते. आपत्कालीन परिस्थितीत वापरासाठी मंजूर केलेली वाहनेही अद्याप खरेदी न होणे, हे महिला सुरक्षेबाबतच्या संथ यंत्रणेचे वास्तव अधोरेखित करते. सखी केंद्र म्हणजे केवळ एक कार्यालय नाही, तर ती पीडित महिलेसाठी पुन्हा उभं राहण्याची संधी असते. जिथे तिची कथा ऐकून घेतली जाते, तिच्या वेदनेवर फुंकर घातली जाते आणि तिला न्यायाचा मार्ग दाखवला जातो. अशी केंद्रे वेळेवर सुरू न होणे म्हणजे अनेक महिलांना एकाकीपणात सोडल्यासारखे आहे.

# विमान अपघात प्रकरणी रोहित पवारांचे गंभीर आरोप

## ■ विमान कंपनीवर दबाव व निष्काळजीपणाचा दावा !



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १०**

**मुंबई :** अजित पवार यांच्या निधनाच्या धक्क्यातून महाराष्ट्र अजूनही सावरलेला नसतानाच, २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान अपघाताबाबत नवनवे संशय व्यक्त केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर अजित पवारांचे पुतणे व आमदार रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन संबंधित विमान कंपनीवर गंभीर आरोप केले.

रोहित पवार यांनी सांगितले की, या अपघाताची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक आहे. संबंधित व्हिएसआर ही कंपनी मुख्यमंत्री तसेच इतर मंत्र्यांना विमानसेवा पुरवते. अशा परिस्थितीत त्यांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाणे अपेक्षित असताना या कंपनीला वारंवार कशासाठी प्राधान्य दिले जाते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. रोहित पवार यांच्या मते, डीजीसीएच्या नियमांनुसार एखाद्या पायलटने विमान उडवल्यानंतर किमान १२ तास विश्रांती घेणे आवश्यक असते. मात्र संबंधित कंपनीकडून पायलटवर दबाव टाकून अवघ्या ७ तासांत पुन्हा विमान उडवण्यास भाग पाडले जात होते. खर्च कमी करण्याच्या नावाखाली पायलटांना नोकरीवरून काढण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचाही आरोप त्यांनी केला. याशिवाय, विमानातील स्टॉल वॉर्निंग सिस्टिम बंद असल्याचा गंभीर आरोपही रोहित पवार यांनी केला. पीटीटी सिस्टिमद्वारे कॉकपीटमधील संवाद स्पष्टपणे कळायला हवा होता, मात्र त्यात कोणताही आवाज येत नव्हता, यावरून सिस्टिम कार्यरत नव्हती, असा दावा त्यांनी केला. ब्लॅक बॉक्सची तपासणी झाल्यानंतर या अपघातामागील अनेक धक्कादायक बाबी समोर येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी करत रोहित पवार यांनी केंद्र व नागरी विमान वाहतूक विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहन केले आहे.

> **विमान अजित पवार यांना घेऊन बारामतीला जाणार होते आणि त्यानंतर शमशाबाद ते पटनाला जाण्याचे नियोजन होते. मात्र व्हिजिबिलिटी कमी असतानाही विमान उतरवण्यात आले. जर विमान पुणे किंवा अन्य ठिकाणी वळवले असते, तर कंपनीला सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाले असते. त्यामुळे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पायलटवर दबाव टाकण्यात आल्याचा संशय रोहित पवार यांनी व्यक्त केलाआहे.**

# लोकलच्या गर्दीने घेतला विद्यार्थ्याचा जीव

## पहिल्याच पेपरच्या दिवशी डोंबिवलीत हृदयद्रावक घटना



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १०**

**डोंबिवली :** बारावीच्या परीक्षा सुरू झालेल्या असताना पहिल्याच पेपरच्या दिवशी लोकलमधील प्रचंड गर्दीमुळे डोंबिवलीतील एका बारावीच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. सोहम सचिन कठरे (वय १८) असे या दुर्दैवी विद्यार्थ्याचे नाव असून सकाळी ९.१५ वाजताच्या सुमारास कळवा–मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान ही घटना घडली. बारावीच्या पहिल्या पेपरसाठी घरातून निघालेला सोहम लोकलच्या डब्यातून प्रवास करत असताना प्रचंड गर्दीमुळे त्याचा तोल गेला आणि तो खाली पडला. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सोहम हा डोंबिवली येथे वास्तव्यास होता व कळव्यातील न्यू कळवा हायस्कूल येथे १२ वी सायन्समध्ये शिक्षण घेत होता.

या दुर्दैवी घटनेमुळे सोहमचे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. परीक्षेच्या तणावात असलेल्या विद्यार्थ्याला लोकलमधील गर्दीने कायमचे हिरावून नेल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

**■ जवळची परीक्षाकेंद्र हवीत**

डोंबिवली येथे राहणाऱ्या सोहमचे परीक्षा केंद्र कळव्यातील माणिशा विद्यालय येथे होते. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात दररोज लांबचा रेल्वे प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सोहमच्या नातेवाईकांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी केली आहे. रेल्वे प्रशासन, शिक्षण मंडळ, शिक्षण मंत्री आणि शाळा प्रशासन यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांसाठी जवळपास परीक्षा केंद्र देण्यात यावीत, तसेच परीक्षेच्या काळात लोकल प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करण्यात याव्यात, अशी ठाम मागणी केली जाणार आहे. लोकलमधील गर्दी हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, आणखी किती निष्पाप जीव गेल्यावर यंत्रणा जागी होणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेची भरीव कामगिरी

## ई-गव्हर्नन्समध्ये राज्यात तिसरा क्रमांक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १०**

**ठाणे :** कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफीस प्रणालीसह कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करत ठाणे जिल्हा परिषदेची वाटचाल वेगाने पेपरलेस कारभाराकडे सुरू आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत ठाणे जिल्हा परिषदेला राज्यातून तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. यापूर्वी मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमातही ठाणे जिल्हा परिषदेने पहिला क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता सिद्ध केली होती.

राज्यात शासकीय कार्यालयांचे कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान व तंत्रज्ञानाधारित व्हावे, या उद्देशाने १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला होता. या अंतर्गत विविध शासकीय कार्यालयांनी राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे मूल्यमापन करून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. या कार्यक्रमात संकेतस्थळ निर्मिती, आपले सरकार पोर्टलशी संलग्नता, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, डॅशबोर्ड, ई-ऑफीस, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, जीआयएस आधारित सेवा आदी माध्यमांतून नागरिकांना देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवांचे त्रयस्थ संस्थेमार्फत सखोल मूल्यमापन करण्यात आले. २६ जानेवारी रोजी हा निकाल जाहीर होणार होता, मात्र निवडणूक आचारसंहितेमुळे तो प्रलंबित ठेवण्यात आला होता.

दरम्यान, मंगळवारी जिल्हा परिषद कार्यालयांच्या संवर्गाचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यानुसार १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पुणे, सांगली, ठाणे, नागपूर व नाशिक जिल्हा परिषदांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये ठाणे जिल्हा परिषदेने २०० पैकी १७६.२५ गुण मिळवून राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. या निवडीमुळे ठाणे जिल्हा परिषद स्तरावर डिजिटल प्रशासन अधिक बळकट होणार असून नागरिकांना सुलभ, जलद व प्रभावी सेवा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. जिल्हा परिषदेच्या या यशामुळे ई-गव्हर्नन्सच्या दिशेने ठाणे जिल्ह्याची वाटचाल अधिक वेगवान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### महाशिवरात्रीनिमित्त अंबरनाथ शहरात वाहतुक बदल लागू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ९**

**अंबरनाथ :** अंबरनाथच्या शिलाहार काळातील ऐतिहासिक शिवमंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षी मोठी जत्रा भरते. येत्या १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या उत्सवासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने, मंदिर परिसरातील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. अंबरनाथ व उल्हासनगर शहराच्या वेशीवर असलेल्या या मंदिराच्या परिसरातील सार्वजनिक वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असून, १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान हे वाहतूक बदल लागू राहणार असल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी वाहनचालकांनी वाहतुकीतील बदलांची विशेष दखल घेणे आवश्यक ठरणार आहे. अंबरनाथ पूर्वेकडील हिंदू स्मशानभूमीकडून गोविंद तीर्थ पुलाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहणार आहे. ही वाहने वैभव हॉटेलकडून हिंदू स्मशानभूमीपासून सरळ वडवली सेक्शन मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकातून हुतात्मा चौक, मटका चौक मार्गे पुढे जातील.

स्वामी समर्थ चौकाकडून गोविंद तीर्थ पुलामार्गे वैभव हॉटेलकडे जाणाऱ्या तसेच उल्हासनगर कॅम्प ५ मधील कैलास कॉलनीकडून येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना स्वामी समर्थ चौक येथे प्रवेश बंद असेल. या वाहनांनी स्वामी समर्थ चौकातून डाव्या बाजूने वळण घेऊन रोटरी क्लब, वडवली सेक्शनमार्गे एकतर्फी वाहतूक करून हिंदू स्मशानभूमी मार्गे वैभव हॉटेलकडे जावे. तसेच स्वामी समर्थ चौकातून उजव्या बाजूने वळण घेऊन कानसई मार्गे सुभाष टेकडी रस्त्याने उल्हासनगरकडे जाण्याची मुभा देण्यात आली आहे. वैभव हॉटेलकडून अंबरनाथ रेल्वे स्टेशनमार्गे मटका चौकापर्यंत येणाऱ्या सर्व जड व अवजड वाहनांना वैभव हॉटेल येथे प्रवेश बंद राहणार आहे.

# सुनेत्रा पवारांनी स्वीकारला उपमुख्यमंत्री पदाचा पदभार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई, दि. १० :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागांचा पदभार स्वीकारला. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील तटकरे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यांच्यासह आमदार, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# महापौर निवडणूक रमजानपूर्वी घ्यावी

## आमदार रईस शेख यांची कोकण आयुक्तांकडे मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १०**

**भिवंडी :** महापौर निवडणुकीला होत असलेल्या दीर्घ विलंबाबाबत चिंता व्यक्त करत भिवंडी पूर्वचे समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी रमजानपूर्वी महापौर निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. महापौर निवडणुकीतील सततचा विलंब राजकीय घोडेबाजाराला चालना देणारा असून त्यामुळे लोकशाही मूल्यांचे नुकसान होत असल्याचे मत आमदार शेख यांनी व्यक्त केले. मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना येत्या १८ फेब्रुवारीपासून सुरू होत असल्याने, त्यापूर्वी महापौर निवडणुकीची तारीख तातडीने जाहीर करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. महापौर निवडणुकीस होत असलेल्या विलंबामुळे लोकशाहीला धोका निर्माण होत असल्याचा इशाराही आमदार रईस शेख यांनी दिला. या संदर्भात आपण सातत्याने विभागीय आयुक्तांकडे पाठपुरावा करत असल्याचे सांगून, कोकण आयुक्तांनी या गंभीर मुद्द्याकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक ती कारवाई करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# शहर अभियंता अनीता परदेशी यांच्या तत्परतेमुळे दुर्गाडी किल्ला सर्कलजवळील खड्ड्यांचा प्रश्न मार्गी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १०**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेकडील दुर्गाडी किल्ला सर्कल परिसरातील रस्त्यावर निर्माण झालेल्या धोकादायक खड्ड्यांमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. विशेषतः भिवंडी–कल्याण महामार्गावरील दुर्गाडी पुलाच्या उतारालगतच हे खड्डे असल्याने कोणत्याही क्षणी मोठा अपघात घडण्याची भीती व्यक्त केली जात होती. हजारो वाहने ये-जा करणाऱ्या या मार्गावर खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावून वाहतूक कोंडी होत असे. दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच पादचाऱ्यांचे जीव अक्षरशः धोक्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यालगतच आणि शहराच्या प्रवेशद्वारावरच अशी अवस्था असणे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे उदाहरण असल्याचे लक्षात येताच या परिस्थितीची कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या शहर अभियंता अनीता परदेशी यांनी तात्काळ दखल घेत परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. कोणताही विलंब न करता त्यांनी संबंधित विभागाला त्वरित सूचना देत युद्धपातळीवर दुरुस्तीचे आदेश दिले.

दैनिक ठाणे जीवनदीपने याबाबत परदेशी यांना सूचित करून वस्तूस्थितीकडे लक्ष वेधले होते. परदेशी यांच्या प्रभावी हस्तक्षेपामुळे अवघ्या २४ तासांत पुलाच्या उतारालगत छत्रपती शिवरायांच्या पुतळ्या भोवती असलेले सर्व खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करण्यात आला आहे. वेळेत ही कारवाई झाली नसती, तर गंभीर अपघात अटळ होते, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

**■ शहर अभियंत्यांच्या कार्यतत्परतेचे कौतुक**

वेळेवर आणि संवेदनशीलपणे करण्यात आलेल्या या कारवाईमुळे संभाव्य अपघात टळले असून नागरिकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. प्रशासनाच्या या जलद प्रतिसादाबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत शहर अभियंता अनीता परदेशी यांच्या कार्यतत्परतेचे विशेष कौतुक केले आहे.



# जीवनदीप महाविद्यालयात HSC परीक्षेला उत्साहात सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (HSC) परीक्षेला सुरुवात झाली. याच अनुषंगाने कल्याण तालुक्यातील गोवेली येथील जीवनदीप महाविद्यालयात परीक्षा केंद्र उपलब्ध झाल्याने परिसरातील विविध महाविद्यालयांतील एकूण १२०४ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी जीवनदीप शिक्षण संस्थेच्या वतीने स्वागताचा विशेष उपक्रम राबविण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे यांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देत परीक्षेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. या प्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रकाश रोहणे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे, निर्मल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. भावना कुंभार, सरस्वती इंग्लिश मीडियम स्कूल वासिंदचे प्राचार्य श्री. जाधव सर, तसेच एस. आर. डी. पब्लिक स्कूल गुरवलीचे संस्थापक श्री. महातो सर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देत परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सकाळी ११ वाजता सुरू झालेला इंग्रजी विषयाचा पेपर परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शांततापूर्ण व सुरळीतपणे पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करत शिस्तबद्ध नियोजनाच्या माध्यमातून जीवनदीप महाविद्यालयाने परीक्षेच्या पहिल्या दिवसाचे यशस्वी आयोजन केले.

# बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय खर्डी (दळखन) येथे आज मंगळवार दिनांक:-१०/०२/२०२६ रोजी इयत्ता १२वी ची परीक्षेस सुरुवात झाली. या परीक्षा केंद्रावर ५३० विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट आहेत . बोर्ड परीक्षा तणाव मुक्त व भयमुक्त निकोप वातावरणात पार पडण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. स्वागतासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या सचिव स्मिता रविंद्र घोडविंदे, सदस्य अनिल घोडविंदे, प्रशांत घोडविंदे , सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार नरेश जाधव, दळखणचे उपसरपंच भगवान मोकाशी, प्रशांत खर्डीकर, शिवसेना तालुकाप्रमुख बाळा धानके, असीफ शेख , सुनील गोपाळे, प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांनी विद्यार्थ्यांना सदिच्छा देऊन विधायक दृष्टिकोनातून पेपरला सामोरे जा व यशाला गवसणी घाला हा अनमोल संदेश दिला. तसेच विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

# जीवनदीप महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना HPCL शिष्यवृत्तीचा लाभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या जीवनदीप महाविद्यालय, गोवेली येथील गरीब, गरजू, होतकरू तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (HPCL) यांच्या वतीने शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. पैशाअभावी कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहू नये, या उदात्त हेतूने HPCL मार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना भरीव आर्थिक सहाय्य मिळत आहे. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये एकूण ४७८ विद्यार्थ्यांना सुमारे २६ लाख रुपयांची




शिष्यवृत्ती देण्यात आली होती. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये २४८ विद्यार्थ्यांना १८ लाख ९० हजार रुपयांची शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. HPCL मध्ये वरिष्ठ व्यवस्थापक (आरोग्य विभाग) म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रफुल विशे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन प्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे व प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. या कार्यक्रमास पंकज गिरी (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मांडा–टिटवाळा), दिनेश कथोरे (युवा नेता, भाजप), प्राची पाटील (प्रसिद्ध मुरबाडी बाई), चिता शेट्टी (ॲक्शन डायरेक्टर), डॉ. आशा गुंजाळ (तालुका वैद्यकीय अधिकारी), सुरेश गायकर, डॉ. प्रतीक्षा घोडविंदे आदी मान्यवर उपस्थित होते. या उल्लेखनीय सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे, ग्रंथपाल. प्रा. राजाराम कापडी, श्री. पंकज मोरे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व पालकवर्गाने HPCL आणि डॉ. प्रफुल विशे यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहेत. दरम्यान, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी तब्बल ८०० विद्यार्थ्यांनी HPCL शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले असून, आगामी काळात अधिकाधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याची माहिती महाविद्यालय प्रशासनाने दिली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिनेश भावार्थे यांचा गौरव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** "समरस महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र" हे ब्रिद मनाशी बाळगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः विशेष लक्ष देऊन सुरु केलेल्या" अनुलोम "माध्यमातून शासकीय योजना व त्यांचा लाभ सर्व सामान्य तळागाळातील नागरिकां पर्यंत पोहचविण्याचे महत्वपूर्ण काम ठाणे जिल्हात अगदी जोमाने व उल्लेखनीय कामगिरी बद्दल मुरबाड भाग चे दिनेश काळुराम भावार्थे यांचा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक जिल्ह्यातिल येवला येथे झालेल्या कार्यक्रमात विशेष पुरस्काराने देऊन सन्मान करण्यात आला आहे.

दिनेश भावार्थे हे गेले अनेक वर्ष ठाणे जिल्हासह संपूर्ण महाराष्ट्रात अनुलोमचे काम करत आहेत. त्यांच्या सर्वोउत्कृष्ट कामाची दखल दस्तूर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने मुरबाड तालुक्यासह संपुर्ण महाराष्ट्रात त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# मोठागांव–माणकोली उड्डाणपुलावर स्टंटबाजांवर पोलिसांची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मोठागांव ते माणकोली उड्डाणपुलावर भरधाव वेगात वाहने चालवून, स्टंटबाजी केल्याची व्हिडीओ प्रसारमाध्यमांवर प्रसारीत झाली होती. त्याअनुषंगाने विष्णुनगर पोलीस तसेच शहर वाहतूक शाखा डोंबिवली उप विभाग यांनी वाहनचालकांवर कारवाई केलेली आहे.

यामध्ये थार जिप क्रमांक MH05-FG-5656 चा चालक पियुष द्वारकानाथ म्हात्रे, वय २१ वर्षे, याच्यावर



कारवाई करून १५०० रूपये दंड तसेच दंडाची थकबाकी ३५०० रूपये वसूल करण्यात आलेली आहे. होंन्डई वेरणा कार क्रमांक MH05-GD-0049 चा चालक वेदांत महेश सावंत वय १८ वर्षे, याच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. स्कॉर्पिओ जिप क्रमांक MH05-CV-3988 या गाडीतून सदर भरधाव वेगात रेसींग करणाऱ्या गाडयाचे व्हिडीओ काढणारा विशाल दिनेश विश्वकर्मा, वय २२ वर्षे, कृष्णा जितेंद्र विश्वकर्मा, वय १९ यांच्या विरोधात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १९५१ चे कलम ११२/११७ प्रमाणे कारवाई केलेली आहे.

स्कॉर्पिओ जिप क्रमांक MH46-CR-4111 या गाडीचा चालक प्रदीप आंबादास ढाकणे, वय २१ वर्षे याच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

हि कारवाई विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम चोपडे, सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत मोरे, सचिन लोखंडे, विष्णुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस पथक, शहर वाहतूक शाखा डोंबिवलीचे पोलीस पथक यांनी केलेली आहे.

# डीप क्लिनिंग मोहिमेत हलगर्जीपणा खपवून घेणार नाही

## – महापौर हर्षाली थविल चौधरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने शहर स्वच्छतेसाठी ९ तारखेपासून डीप क्लिनिंग मोहिमेला सुरुवात करण्यात आली असून या मोहिमेचा स्वतः महापौर हर्षाली थविल चौधरी बारकाईने आढावा घेत आहेत. कालपासून सुरू झालेल्या या मोहिमेअंतर्गत आज महापौरांनी कल्याण पश्चिमेकडील खडकपाडा परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीदरम्यान दुकान व हॉटेलबाहेरील फुटपाथवर कचऱ्याने भरलेल्या मोठ्या बॅगा ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. घंटागाडी येणार असल्याच्या कारणावरून या बॅगा आधीच दुकानाबाहेर ठेवण्यात आल्याचे दिसून आले. ही बाब लक्षात येताच महापौर हर्षाली थविल चौधरी यांनी वाहनातून उतरून संबंधित दुकानदारांना कचऱ्याच्या बॅगा घंटागाडी आल्यानंतरच बाहेर काढण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

त्यानंतर महापौरांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना जागेवर बोलावून खडेबोल सुनावत डीप क्लिनिंग मोहिमेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट केले. ही मोहीम शहर स्वच्छतेसाठी असून कल्याण–डोंबिवली शहर स्वच्छ राहिलेच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

शहर स्वच्छतेच्या कामात कसूर किंवा दुर्लक्ष झाल्यास कोणतीही हयगय केली जाणार नाही, अशी सक्त ताकीद महापौर हर्षाली थविल चौधरी यांनी अधिकाऱ्यांना दिली. त्यांच्या या कडक भूमिकेमुळे प्रशासनात हालचाल वाढली असून डीप क्लिनिंग मोहिमेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# शिवकालीन १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा सन्मान

## मंत्री आशिष शेलार फ्रान्स भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 10 :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार हे आज रात्री शिष्टमंडळासह फ्रान्स दौऱ्यावर जाणार आहेत.

11 फेब्रुवारी ते 16 फेब्रुवारी 2026 दरम्यान ते पॅरिस येथे होणाऱ्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभागी होतील. युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याला एका विशेष कार्यक्रमात ते अभिवादन करणार आहेत. सुमारे दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी 11 जुलै 2025 रोजी, युनेस्कोच्या 47व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील 12 किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र मंत्री ॲड.शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पॅरिस येथे स्वीकारणार आहे.

# घरफोडीप्रकरणी मुरबाड पोलिसांची मोठी कारवाई




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड पोलिसांनी घरफोडीसह अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये सराईत गुन्हेगारांना अटक करत साडेपाच लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून गुन्ह्यांचा यशस्वी उलगडा केला आहे.मुरबाड शहरातील माऊली नगर परिसरात, आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्यासमोरील दत्तकृपा इमारतीत २४ जानेवारी रोजी भरदिवसा घरफोडी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांनी सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरल्याची तक्रार मुरबाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधिक्षक डॉ. डी. स्वामी, अनमोल मित्तल आणि उपविभागीय पो. अधिकारी अनिल लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो. निरीक्षक दादासाहेब एडके यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते.

या पथकात सपोनि संदीपान सोनवणे, उपनिरीक्षक श्याम आरमळकर, पो.हवा.रामदास शिंदे, नितीन घाग, राहुल गावडे, धनराज देवरे, पो. अर्जुन पारधी यांचा समावेश होता. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू करण्यात आला.सराईत गुन्हेगारांना अटक तपासा दरम्यान पोलिसांनी शेरा सुरेश चव्हाणआणि सद्दाम हुसेन जमलुद्दीन खान यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी घरफोडीसह अनेक गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे ५.५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, या कारवाईमुळे अनेक गंभीर गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे. या गुन्ह्यातील इतर आरोपींवरही गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.मुरबाड पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे शहर व परिसरात चोरी करून दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांना जेरबंद केल्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# "तो राजहंस एक..." : खळे काकांच्या स्वरसाधनेला रसिकांचा भावपूर्ण प्रतिसाद



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील सुप्रसिद्ध श्री समर्थ सेवक मंडळाच्या सांस्कृतिक व संकीर्ण शाखेतर्फे दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या श्रीमत् दासनवमी उत्सवाचे यंदा १११ वे वर्ष मोठ्या उत्साहात पार पडत आहे. या उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी महान संगीतकार श्रीनिवास खळे (खळे काका) यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या निवडक अजरामर गीतांचा "तो राजहंस एक..." हा विशेष संगीत कार्यक्रम समर्थ मंदिराच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आला. मंडळाचे विश्वस्त अनिल हजारे व निशिकांत साठे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या कार्यक्रमात पूर्वा आर्ते, मयुरी पुराणिक, मंजिरी प्रभू, चैतन्य फाटक, मिलिंद दामले व रवींद्र कारेकर यांनी खळे काकांच्या अजरामर रचनांचे भावपूर्ण सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाला राजन गोरे यांनी तबल्यावर सुरेख साथ दिली. तर शरद शिधये (सिंथेसायझर) आणि आर्यन पाटील (पखवाज, ढोलकी व तालवाद्ये) यांनी आपल्या वादनातून कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली. शब्दांची अचूक पेरणी व कार्यक्रमाची भावभावना नेमकेपणाने रसिकांपर्यंत पोहोचवणारे पूर्णिमा जोशी यांचे सूत्रसंचालन विशेष लक्षवेधी ठरले. अनिल हजारे व निशिकांत साठे यांच्या मार्गदर्शनाखाली गायक-गायिका, वादक व सूत्रसंचालक यांच्या अथक परिश्रमातून साकार झालेली ही संगीत मैफिल रसिकांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळणारी ठरली. टाळ्यांच्या कडकडाटात रसिकांनी कलाकारांचे भरभरून कौतुक केले.

# शाहू शिक्षण संस्थेत विविध स्पर्धांचा उत्साह



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शाहू शिक्षण संस्था अध्यापक महाविद्यालय, बी.एड., शहाड विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, फुल सजावट, नेल आर्ट स्पर्धा, हेअर स्टाईल स्पर्धा तसेच फूड स्टॉल (खाद्य मेळावा) या उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमास शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके यांची उपस्थिती लाभली. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ पत्रकार बाबा रामटेके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्या वैशाली पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. कल्पना सोमनाचे, प्रा. बबन पाटील, प्रा. अनघा चौधरी, प्रा. डॉ. सुस्मिता म्हाळुंकर, प्रा. योगिनी घरत, ग्रंथपाल प्रा. अनघा मोडक तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना नियोजनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी बी.एड. प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी तसेच शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपली कला, कल्पकता व कौशल्य सादर केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांचा मनमुराद आनंद घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# भविष्यवेध



बुधवार
११ फेब्रुवारी २०२६

**मेष**
लोकांवर अधिकार गाजवण्याच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवा; त्याचा कामावर परिणाम होऊ शकतो. जवळच्या व्यक्तीकडून काही चांगली बातमी मिळू शकते.

**वृषभ**
तुमच्या करिअरच्या बाबतीत, तुमच्यावर तुमच्या क्षमतेपेक्षा जास्त जबाबदाऱ्यांचा भार पडू शकतो. कोणतेही निर्णय काळजीपूर्वक घ्या.

**मिथुन**
तुमच्या प्रेम जोडीदारासाठी आजचा दिवस खूप छान असेल. जोडीदाराचे प्रमोशन होईल, आनंद वाढेल. एकत्र जेवणासाठी बाहेर जाल, नाते अधिक जवळ येईल.

**कर्क**
तुम्ही आज येणाऱ्या सर्व आव्हानांना धैर्याने तोंड दिले तर तुम्हाला यश मिळेल. मात्र, चांगल्या भविष्यासाठी तुम्हाला आळस सोडावा लागेल. महत्वाचा निर्णय घ्याल.

**सिंह**
एखाद्या कंपनीत मुलाखतीसाठी आमंत्रित केले जाऊ शकते. इच्छुक लेखकांचा लेख किंवा पुस्तक एखाद्या मोठ्या प्रकाशकाद्वारे प्रकाशित केले जाऊ शकते.

**कन्या**
तुमची कारकीर्द आता पूर्णपणे नवीन वळण घेईल. आर्किटेक्टना नवा प्रोजेक्ट मिळेल, चांगलं यश मिळेल. जे बेरोजगार आहेत त्यांना नोकरी मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ**
वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल. तुमचा जोडीदार तुमच्या प्रयत्नांमध्ये तुम्हाला साथ देईल. कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी निघालात तर ते साध्य होईल.

**वृश्चिक**
आज तुम्ही एखाद्या जुन्या मित्राला त्यांच्या घरी भेट देऊ शकता, जिथे तुम्ही वैयक्तिक समस्यांवर चर्चा कराल. तोडगा निघेल, बोलून बरं वाटेल.

**धनु**
संध्याकाळी तुम्ही घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात जाऊ शकता. आज तुमचे आरोग्य उत्तम राहील. तुमच्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला भेटवस्तू मिळेल.

**मकर**
इतरांशी बोलताना योग्य भाषेचा वापर करा. सोशल नेटवर्किंगच्या क्षेत्रातील लोकांना नवी संधि मिळेल. प्रवासाला जाताना आवश्यक वस्तू पॅक करायला विसरू नका.

**कुंभ**
तुम्ही घाईघाईने काम केले तर सर्व काही बिघडेल. या राशीच्या अविवाहित लोकांना आज नातेसंबंध मिळू शकतात. घरचे विवाहाची योजना आखू शकतात.

**मीन**
खूप दिवसांपासून प्रयत्न करत आहात त्या यशस्वी होणार आहेत. एकेकाळी प्रयत्नांना व्यर्थ मानत होता ते यशस्वी होतील. म्हणून, कुटुंबासह आनंद साजरा करा.

# तांत्रिक प्रगतीसोबतच सुरक्षिततेचे भान ठेवणे ही काळाची गरज

## -निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे,दि.10 :** 10 फेब्रुवारी 2026, 'सुरक्षित इंटरनेट दिवस' जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात साजरा करण्यात आला. यावेळी तांत्रिक प्रगतीसोबतच सुरक्षिततेचे भान ठेवणे, ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने यांनी आज सुरक्षित इंटरनेट दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ विजयकुमार कट्टी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी घनश्याम कुमार मेहता, तहसिलदार सचिन चौधर, आयआरएडी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हिमानी शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने म्हणाले की, सध्याच्या काळामध्ये इंटरनेट व त्यासंदर्भातील साधने सुरक्षित आहेत का ? इंटरनेटचा वापर सुरक्षित आहे का ? आपण इंटरनेट वापरतो की इंटरनेट आपल्याला वापरतो, याचा आपण विचार करायला हवा. इंटरनेटचा वापर जबाबदारीने करणे आवश्यक आहे. सुरक्षित इंटरनेट, एआय चा वापर करताना त्याचा कामकाजात फायदा जरी होत असला तरी त्याचा योग्य वापर न केल्यास गैरप्रकार होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम माणसावर होतो. म्हणून इंटरनेटचा वापर सुरक्षितपणे करायला पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी आयआरएडी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हिमानी शेंडे यांनी सादरीकरणाद्वारे सुरक्षित इंटरनेट वापरसंबंधीची माहिती दिली. दरवर्षी, फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात सुरक्षित इंटरनेट दिन साजरा केला जातो, विशेषतः मुले, महिला आणि तरुणांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदार वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी यावर्षी, सुरक्षित इंटरनेट दिन 10 फेब्रुवारी 2026 रोजी "स्मार्ट टेक, सुरक्षित निवडी - एआयचा सुरक्षित आणि जबाबदार वापर एक्सप्लोर करणे" या थीम अंतर्गत साजरा केला जाईल. त्या पुढे म्हणाल्या की, या वर्षीची थीम, "स्मार्ट टेक, सुरक्षित निवडी - AI चा सुरक्षित आणि जबाबदार वापर", सध्याच्या काळात खूपच समर्पक आहे. सर्वसामान्यांसाठी काही महत्त्वाचे 'सायबर सुरक्षा मंत्र' खालीलप्रमाणे आहेत.

**■ सुरक्षित इंटरनेटसाठी महत्त्वाच्या टिप्स :**

- AI चा जबाबदार वापर: कोणत्याही AI टूलवर आपली वैयक्तिक किंवा गोपनीय माहिती शेअर करू नका. AI ने दिलेली माहिती नेहमी पडताळून पहा.
- सायबर स्वच्छता (Cyber Hygiene): तुमचे सर्व पासवर्ड वेळोवेळी बदला आणि ते 'Strong' (अक्षरे, अंक आणि चिन्हांचे मिश्रण) ठेवा.
- टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA): तुमचे सोशल मीडिया आणि बँक खाती सुरक्षित ठेवण्यासाठी 'Double Layer' सुरक्षा फिचर नेहमी चालू ठेवा.
- शंकास्पद लिंक टाळा: अनोळखी व्यक्तींकडून आलेले ई-मेल, मेसेज किंवा व्हॉट्सअ‍ॅपवरील संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका.
- अल्पवयीन मुलांचे संरक्षण: मुले इंटरनेटवर काय पाहत आहेत आणि कोणाशी संवाद साधत आहेत, यावर पालकांनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे.




**प्रमुख पाहुणे विजयकुमार कट्टी यांनी एआय आणि विविध संदर्भ यांचा वापर करुन जेमिनी ई-बुकचा वापर करुन सुरक्षित इंटरनेट संदर्भात माहिती दिली. भारतातील ग्रामीण भागांसह देशाच्या सर्व भागात इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली आहे आणि तांत्रिक प्रगतीमुळे ई-सेवा आणि डिजिटल पेमेंट सक्षम झाले आहेत. परंतु सायबर धोके देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याव्यतिरिक्त, दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत आहे, जो आपण कसे संवाद साधतो, काम करतो, शिकतो आणि निर्णय घेतो, यावर परिणाम करतो. इंटरनेट आणि इतर गोष्टींचा सुरक्षित आणि जबाबदार वापर आणि सायबर स्वच्छतेच्या प्रासंगिकतेबद्दल तळागाळातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, हे एक प्रमुख लक्ष केंद्रित क्षेत्र आहे. या निमित्ताने, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (Meity) 10 फेब्रुवारी 2026 रोजी देशव्यापी जागरूकता मोहीम आयोजित करत आहे. माहिती सुरक्षा शिक्षण आणि जागरूकता (ISEA) प्रकल्पांतर्गत आयोजित केलेल्या या उपक्रमाचा उद्देश विविध इंटरनेट वापरकर्त्यांना सुरक्षित ऑनलाइन पद्धती, सायबर स्वच्छता, प्रमुख सायबर धोके आणि प्रभावी शमन धोरणांबद्दल शिक्षित करणे आहे, तसेच नागरिकांमध्ये इंटरनेट आणि AI चा जबाबदार वापर वाढवणे आहे.**

# पाणी बिल थकबाकीदारांवर मनपाची कारवाई ● ९ कोटींहून अधिक वसुली

- **ठाणे महापालिकेकडून पाणी बिल थकबाकीदारांवर कडक कारवाई**
- **अवघ्या १५ दिवसांत ९ कोटी ८८ लाख १४ हजार ३४५ रुपयांची वसुली**
- **एकूण १०७४ नळसंयोजने खंडित**
- **२०२ पंप जप्त, ७५ पंप रूम सील**
- **५०५६ थकबाकीदारांना नोटिसा**
- **दिवा, मुंब्रा, कळवा, नौपाडा-कोपरी, उथळसर, वर्तकनगर, वागळे आदी प्रभागांत कारवाई**
- **महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार मोहीम सुरू**
- **कारवाई पुढेही सुरूच राहणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे स्पष्ट संकेत**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १५ ठाणे :** ठाणे महानगरपालिका हद्दीत पाणी बिल थकबाकीदारांवर महापालिकेने कडक कारवाई सुरू केली असून गेल्या १५ दिवसांत तब्बल ९ कोटी ८८ लाख १४ हजार ३४५ रुपयांची वसुली करण्यात आली आहे. या मोहिमेत प्रभाग समितीनिहाय नळसंयोजन खंडित करणे, पंप जप्त करणे, पंप रूम सील करणे व नोटिसा देणे अशी कारवाई करण्यात आली.

या कालावधीत एकूण १०७४ नळसंयोजन खंडित, २०२ पंप जप्त व ७५ पंप रूम सील करण्यात आल्या असून ५०५६ थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार ही मोहीम सुरू असून पुढेही ती सुरूच राहणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. याशिवाय नागरिकांनी थकीत पाणीबिले तातडीने भरावीत, अन्यथा कारवाई अधिक तीव्र केली जाईल असा इशाराही महापालिकेने दिला आहे. महापालिकेच्या या मोहिमेमुळे थकबाकीदारांमध्ये खळबळ उडाली असून महसूल वसुलीस मोठी चालना मिळाल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

## जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारातून

# शुक्रवारी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगार, प्रशिक्षण व स्वयंरोजगाराच्या संधी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारातून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

रोजगाराच्या शोधात असलेल्या उमेदवारांना थेट नोकरीच्या संधी मिळाव्यात, तसेच प्रशिक्षण व उद्योजकतेकडे वळण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने १३ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ठाणे आणि लाईट हाऊस कम्युनिटी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही रोजगार मेळावा आयोजित करण्यात येत असून, सकाळी १०.०० वाजता ही प्रक्रिया सुरू होणार आहे. हा मेळावा ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात पार पडणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपायोजना राबविण्यात येतात. याच अंतर्गत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात दहावी, बारावी, पदवीधर तसेच आय.टी.आय., डिप्लोमा धारक उमेदवारांसाठी विविध खासगी आस्थापनांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणाच्या संधी, तसेच स्वयंरोजगार सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी शासकीय महामंडळांच्या कर्ज योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

## अंबरनाथ चिखलोली न्यायालय

# वकील संघटनेच्या अध्यक्षपदी प्रियेश जाधव

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १०**

**अंबरनाथ :** चिखलोली येथे नव्याने सुरू झालेल्या चिखलोली कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय व प्रथमवर्ग दंडाधिकारी न्यायालयाच्या वकील संघटनेची २०२६–२८ या कार्यकाळासाठीची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत बदलापूर येथील ॲड. प्रियेश जाधव यांनी अध्यक्षपदावर विजय मिळवला असून, उपाध्यक्षपदी संदीप पगारे तर सचिवपदी सत्यम पिल्ले यांची निवड झाली आहे. नव्याने स्थापन झालेल्या न्यायालयातील या निवडणुकीकडे वकिलांमध्ये विशेष उत्सुकता होती.

उल्हासनगर येथील न्यायालयावरील वाढता ताण कमी करण्यासाठी अंबरनाथ शहरात कनिष्ठ न्यायालय उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. अखेर अंबरनाथच्या चिखलोली परिसरात या न्यायालयाची उभारणी पूर्ण झाली. त्यानंतर काही काळ लोकार्पण रखडले होते. मात्र गेल्या वर्षी ९ ऑगस्ट रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच वरिष्ठ न्यायाधीशांच्या उपस्थितीत या न्यायालयाचे लोकार्पण करण्यात आले आणि त्यानंतर न्यायालयीन कामकाजाला सुरुवात झाली.

नव्यानेच स्थापन झालेल्या या न्यायालयात वकील संघटनेची निवडणूक जाहीर करण्यात आली होती. या निवडणुकीसाठी दोन दिवसांपूर्वी मतदान प्रक्रिया पार पडली, तर नुकताच त्याचा निकाल जाहीर झाला. अत्यंत चुरशीच्या आणि उत्साही वातावरणात पार पडलेल्या या निवडणुकीत ॲड. प्रियेश जाधव यांनी अध्यक्षपदावर बाजी मारली. निवडीनंतर वकिलांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले असून, न्यायालयीन कामकाज अधिक प्रभावी, पारदर्शक आणि वकिलाभिमुख करण्यासाठी संघटना सक्रिय भूमिका बजावेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# "लेखापरीक्षणावरून नवी मुंबईत राजकीय रणकंदन

## खा. नरेश म्हस्केंचा उपमहापौर भगतांना इशारा"

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** आपण काचेच्या घरात राहतो, दुसऱ्याच्या घरावर दगड मारण्याचा प्रयत्न करू नका. अशा शब्दांत नवी मुंबईचे खासदार नरेश म्हस्के यांनी नवी मुंबईचे नवनिर्वाचित उपमहापौर दशरथ भगत यांना सुनावलं आहे. रविवारी नेरुळ येथील एका कार्यक्रमादरम्यान खा. म्हस्के बोलत होते. उपमहापौर पदाची धुरा हाती घेताच दशरथ भगत यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या मागणीला पुढे नेत प्रशासनातील व्यवहारांचे लेखापरीक्षण करण्याची मागणी केली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून



खा. नरेश म्हस्के यांनी उपमहापौर दशरथ भगत यांना सुनावले आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांच्यासह माजी खासदार संजीव नाईक, भाजपचे गट नेते सागर नाईक आणि भाजपचे नवी मुंबईतील पदाधिकारी सातत्याने गेल्या ६ वर्षातील महापालिकेच्या प्रशासनामार्फत झालेल्या व्यवहारांची चौकशी करून श्वेतपत्रिका काढण्याची मागणी करत आहेत.

त्यानुसार उपमहापौर पदी विराजमान झाल्यानंतर दशरथ भगत यांनीही नाईक कुटुंबियांच्या मागणीला पाठिंबा दर्शवत गेल्या ६ वर्षात जे काही प्रशासनामार्फत निर्णय घेतले गेले त्याची सखोल चौकशी व्हावी ही जनतेची मागणी असून, आम्ही जनतेच्या वतीने बोलतोय असे म्हटले होते. मात्र, उपमहापौर दशरथ भगत यांच्या वक्तव्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मोठी नाराजी निर्माण झाल्याचे चित्र आहे.

गेल्या ६ वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत भाजपच्या माजी नगरसेवकांना डावलून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या प्रभावामुळे शिवसेनेतील माजी नगरसेवकांची कामे वेगाने मार्गी लागत असल्याचा आरोप भाजपच्या माजी नागरसेवकांकडून करण्यात आला होता. याबद्दलची जाहीर नाराजी माजी नगरसेवकांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्यासमोर मांडलीही होती. माजी खासदार संजीव नाईक यांनी देखील याला दुजोरा देत विकासनिधी मिळाला नाही तर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करू असा इशाराही दिला होता.



# आयुक्त अभिनव गोयल यांची शास्त्रीनगर रुग्णालयास अचानक भेट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी**

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज सकाळी शास्त्रीनगर रुग्णालयास अचानक भेट देत रुग्णांची आपुलकीने विचारपूस केली. यावेळी त्यांनी रुग्णालय व्यवस्थापनाच्या कामकाजाचा आढावा घेत रुग्णसेवेत कोणताही हलगर्जीपणा होऊ नये, स्वच्छता राखली जावी तसेच औषध वितरणाबाबत योग्य नियोजन व अंमलबजावणी करण्याचे कडक निर्देश रुग्णालय प्रशासनाला दिले.**

# वसई–विरारच्या विकासाला गती

## महापौर अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई: वसई विरार महापालिकेच्या महापौर पदी अजीव पाटील यांची निवड झाली आहे. या निवडीनंतर त्यांनी आपल्या कामकाजाला सुरुवात केली आहे. मंगळवारी महापौरांनी दालनात महापालिकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेत शहरात सुरू असलेले विविध प्रकल्प व नियोजित प्रकल्प, पायाभूत सोयीसुविधा याबाबतचा आढावा घेतला.**

३ फेब्रुवारी २०२६ ला अजीव पाटील यांनी महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर शहराच्या विकासासाठी आणि समस्या सोडवण्यासाठी तातडीने कामाला सुरुवात केली आहे, ज्यामध्ये रस्ते, पाणी पुरवठा आणि स्वच्छता यावर भर दिला आहे. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी महापौरांच्या दालनात महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस, महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, दीपक सावंत, नगरसेवक प्रफुल्ल साने प्रवीण शेट्टी, महापालिका उपायुक्त व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी शहरातील पाणी पुरवठा, परिवहन सेवा, आरोग्य सेवा, सुरू असलेली रस्त्यांची कामे, उड्डाणपूल, रिंगरूट, दिव्यांग पार्क, बर्ड पार्क, संविधान पार्क, नाट्यगृह, क्रीडा संकुल, सेंटिस प्रकल्प, शहरात सीसीटीव्ही लावणे, स्वच्छता, सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न, स्मशानभूमी, विविध योजना, सांडपाणी प्रकल्प, समुद्र किनारे सुशोभिकरण अशा विविध कामांच्या संदर्भात चर्चा करीत आढावा घेण्यात आला. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाची कामे चांगल्या प्रकारे मार्गी कशी लागतील यावर अधिक भर दिला जाणार असल्याचे महापौर अजीव पाटील यांनी स्पष्ट केले. याशिवाय जी कामे अपूर्ण आहेत ती कामे जलदगतीने पूर्ण झाली पाहिजेत अशा सूचनाही त्यांनी या बैठकीत केल्या असल्याचे अजीव पाटील यांनी सांगितले आहे.

# सूर्या कालव्याच्या दुरुस्तीला शेतकऱ्यांचा विरोध

## रब्बी हंगामात 15 गावांतील सुमारे 5 हजार शेतकरी शेतीपासून वंचित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १०**

**बोईसर :** सूर्या धरण प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालव्याच्या दुरुस्तीच्या कामाला काही शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे रब्बी हंगामात १५ गावांतील सुमारे ५ हजार शेतकरी शेतीपासून वंचित राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर पालघर पाटबंधारे विभागाकडून विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू असून, येत्या मार्च महिन्यापर्यंत कालव्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सूर्या प्रकल्पाच्या उजवा व डावा तीर कालव्यांच्या माध्यमातून डहाणू व पालघर तालुक्यातील सुमारे ६० गावांतील शेतीसाठी सिंचनाचे पाणी पुरवले जाते. दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सिंचन आवर्तनाला सुरुवात होते. मात्र सन १९८५–९० दरम्यान तयार करण्यात आलेले मुख्य कालवे व वितरिकांच्या नादुरुस्त अवस्थेमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असून सिंचन क्षेत्रात लक्षणीय घट झाली आहे.

मूळ १६ हजार हेक्टरचे उद्दिष्ट असलेले सिंचन क्षेत्र सध्या अवघ्या ४ ते ५ हजार हेक्टरपर्यंत मर्यादित राहिले आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी पालघर पाटबंधारे विभागामार्फत नादुरुस्त कालव्यांचे मजबुतीकरण, काँक्रीट अस्तरीकरण तसेच बंदिस्त नलिका वितरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. मागील वर्षी डावा तीर कालव्याचे १३ किमी व उजवा तीर कालवा शाखा एकचे २० किमी लांबीचे मजबुतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले होते.

ठाणे ■ बुधवार
११ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# घंटागाडी चालकांचे पगार थकीत ; युनियनची पालिकेकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत घंटागाडीवर कार्यरत असलेल्या चालकांचा थकीत पगार त्वरित अदा करण्याची मागणी महाराष्ट्र म्युनिसिपल कामगार युनियनने केली असून याबाबत त्यांनी केडीएमसी महापौर हर्षाली चौधरी थविल यांची भेट घेतली.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत घंटागाडीवर कार्यरत असलेले ठोक पगारी जड वाहन चालक नियमितपणे आपले काम पार पाडत असतानाही त्यांचा १५ डिसेंबर पासून अद्यापपर्यंतचा पगार अदा करण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित कामगारांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत तातडीने दखल घेऊन संबंधित ठोक पगारी जड बाहन चालकांचा थकीत पगार त्वरित अदा करण्याची व्यवस्था करावी. तरोच, सदर कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने सकारात्मक विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा अशी मागणी महापौरांकडे करण्यात आली. यावेळी युनियनचे संघटक मच्छिंद्र सकट, कॉम्रेड उदय चौधरी उपस्थित होते.



## लेटलतिफांना पालिकेचा दणका

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** महापालिकेत सोमवारी सकाळी उशिरा पोहोचलेल्या ३५ कर्मचाऱ्यांना पालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी दणका दिला. एका दिवसाचे वेतन का कापले जाऊ नये, अशा आशयाची नोटीस बजावली आहे. महापालिकेच्या प्रवेशद्वारावरच उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना थांबविण्यात आले. अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांनी उशिरा आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची यादी तयार केली होती. या सर्वांना नोटीस बजावण्यात आली असून २४ तासांच्या आत खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# खर्डी येथे पेटंट व ट्रेडमार्कवर ऑनलाइन मार्गदर्शन कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी :** जीवनदीप शैक्षणिक संस्था संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथेदिनांक 09 फेब्रुवारी 2026 रोजी ग्रंथालय व भूगोल विभाग यांच्य संयुक्त विद्यमाने "बौद्धिक संपदा हक्क (IPR - Intellectual Property Rights)" या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून बी. के. बिर्ला महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा अनिल गाढे मॅडम व ट्रेंड मार्क सल्लागार श्री तानाजी गजानन तारमळे सर लाभले होते.

डॉ. प्रतिभा गाढे मॅडम यांनी पेटंट या विषयावर तर श्री तानाजी तारमळे सर यांनी ट्रेडमार्क या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या सादरीकरणातून मान्यवरांनी विषयाशी निगडित सखोल माहिती देऊन उपस्थितांच्या शंकांचे उत्कृष्टरित्या निरसन केले.

सदर कार्यशाळा जीवनदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री रवींद्र घोडविंदे सर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.प्राचार्यांनी आपल्या प्रस्ताविकेतून आशा कार्यशाळेच्या आयोजनामागील महाविद्यालयायाची भूमिका मांडली.

या संपूर्ण कार्यशाळेचे आयोजन ग्रंथालय विभागाचे प्रमुख डॉ. विनोद होले सर व भूगोल विभाग प्रमुख प्रा. विशाल भोसले सर यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. रेश्मा घोडविंदे मॅडम व आभार प्रदर्शन प्रा. रजनी परदेशी मॅडम यांनी केले.

सदर कार्यशाळेस प्राध्यापकवृंद, संशोधक, अभ्यासक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्वांचे आभार मानण्यात आले.




# उरणमध्ये मतदारांचा कौल महाविकास आघाडीला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण :** उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजपचा अक्षरशः धुव्वा उडवत सत्तेवर निर्विवाद कब्जा केला आहे. मतदारांनी भाजपला संपूर्णपणे नाकारत उरणमध्ये महाविकास आघाडीच एकमेव निर्णायक शक्ती असल्याचा ठाम कौल दिला आहे.

४ जिल्हा परिषद व ८ पंचायत समिती सदस्य पदांच्या निवडणुकीत एकूण १२ पैकी १० जागा महाविकास आघाडीने पटकावत भाजपला कोपऱ्यात ढकलले आहे. भाजपला केवळ १ जिल्हा परिषद व १ पंचायत समिती जागेवर समाधान मानावे लागले, हा निकाल भाजपसाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), शेतकरी कामगार पक्ष आणि मनसे या घटक पक्षांनी एकजुटीने लढा देत, काटेकोर नियोजन आणि आक्रमक प्रचाराच्या जोरावर भाजपच्या फाजील आत्मविश्वासाला मतपेटीतून चोख उत्तर दिले.

विजयी सदस्यांची यादी

**जिल्हा परिषद : महाविकास आघाडीचे निवडून आलेले सदस्य -**
ॲड. अविनाश विजय ठाकूर – चिरनेर,
प्रेरणा कुणाल पाटील – नवघर,
डॉ. मनिष पाटील – जासई,
आणि फक्त एक जागा भाजपाची-
रीना जितेंद्र घरत – चाणजे

**पंचायत समिती : महाविकास आघाडीचे निवडून आलेले सदस्य -** परेश धनाजी ठाकूर – नवघर,
दिपक सुरेश भोईर – भेंडखळ,निर्मला नरेश घरत -जासई, प्रियांका दिपक मढवी – चिर्ले,महेश महादेव म्हात्रे – केगाव,
कविता रूपेश पाटील – चिरनेर
प्रारंभी अविनाश गावंड – आवरे - महाविकास आघाडी, आणि फक्त भाजपाचा एक उमेदवार पंचायत समितीला-कैलास मोरेश्वर भोईर – चाणजे

या निकालामुळे भाजपचे सर्व अंदाज कोसळले असून, आमदारकीच्या निवडणुकीत मिळालेल्या मतांचे गणित जिल्हा परिषद व पंचायत समितीत पूर्णपणे फसल्याचे स्पष्ट झाले आहे. उरणमध्ये भाजपला आत्मचिंतन नव्हे तर आत्मपरीक्षण करावे लागणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.विजयानंतर उरण शहर व ग्रामीण भागात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत "उरण आमचाच"चा नारा दिला, तर या निकालाने २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची दिशा स्पष्ट झाली असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## सार्वजनिक गार्डनच्या जागेसाठी ग्रामस्थांचा लढा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड नगरपंचायत हद्दीतील मौजे सोनारपाडा येथिल स. न. २६७/१/२ या जमिन मिळकतीवर बेकायदेशीर कंपाऊंड करून दुकानाचे गाळे व घर बांधून अतिक्रमण केल्यामुळे एकनाथ सदानंद चिराटे यांच्यावर कायदेशीर कारवाई करून सदरचे अतिक्रमण हटवावे या मागणीसाठी समाजसेवक मुरलीधर अभिमन्यू बगाडे, समाजसेवक सचिन शेळके,नगरसेविका मोनिका शेळके, संकेत भोईर व इतर स्थानिक ग्रामस्थ यांनी मुरबाड तहसीलदार कार्यालया समोर आमरण उपोषण पुकारले आहे.

सदर मिळकत ही पुर्वी जुना स. न. ७५/१ ही शंकर पांडुरंग जाधव व राजाराम गणपत जाधव यांच्या नावे नोंद असलेली दिसून येत आहे.परंतु मा. जिल्हाधिकारी यांच्या कडील अकृषिक आदेशानुसार दि. १५/१०/१९८३ साली ती अकृषीक करण्यात आली आहे.तद्नंतर सदर जमिनीचे २९ प्लॉट करण्यात आलेले दिसत असून उर्वरित जमिनीत गार्डन, ओपन स्पेस, व रस्ते या करिता मोकळे प्लॉट आरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. मुळ मालकाने सदर प्लॉट मुरबाड नगरपंचायला हस्तांतरित करने कायद्याच्या दृष्टीने अपेक्षित होते. परंतु मुळ मालक राजाराम गणपत जाधव यांनी हे प्लॉट नगरपंचायत कडे हस्तांतरीत केले नाहीत असे उपोषण कर्त्यांचे म्हणने आहे.सदर स. न. २६७/१/२ या जमिनी मधील गार्डनसाठी आरक्षित असलेला भूखंड हा कायद्यानुसार नगरपंचायत मुरबाड यांचे असून याचा निर्विवाद मालकी हक्क व कब्जा वहिवाटीची असूनही या गार्डन प्लॉट वर जे गाळे व घर बांधले आहे ते तात्काळ निष्कासित करावेत, गार्डन मुलांसाठी खुला करावा व तिथे असणारे श्रीदत्त मंदिर सर्वासाठी खुले करावे आदी मागण्या घेऊन सोनारपाडा ग्रामस्थ उपोषणाला बसले आहेत.

**मुरबाड नगरपंचायतने सोनारपाडा येथिल ओपन स्पेस गार्डनवर झालेले अतिक्रमण तात्काळ निष्कासित करावे, तिथे असणारे श्रीदत्त मंदिर सर्वासाठी खुले करावे व सदर गार्डन परिसरातील मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध करून द्यावे.**
**- सचिन शेळके, सामाजिक कार्यकर्ते, सोनारपाडा**

# पडघ्यात संत सेना महाराज व गणेशमूर्तीचा वर्धापन दिन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे श्री. संत सेना महाराज व गणेश मुर्तीचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

ह. भ. प. विश्वनाथ महाराज केंद्रे (देवाची आळंदी) ह. भ. प. रमाकांत महाराज शास्त्री, घनःश्याम महाराज कुडुसकर यांच्यां मार्गदर्शनाखाली संत सेना महाराज व महीला मंडळ पडघे यांच्या वतीने श्री संत सेना महाराज व गणेशमूर्तीचा १२ वा वर्धापन दिन सोहळा न्हावी आळी येथील संत सेना महाराज मंदीरात सोमवारी घेण्यात आला यावेळी श्रीचां अभिषेक, कळस पुजन, सायंकाळी संत जगद्गुरू तुकाराम महाराज हरीपाठ मंडळ यांचे सामुदायिक हरिपाठ, किर्तन नंतर महाप्रसाद व संत सेना महाराज महीला मंडळाच्या वतीने पारंपारिक वेशभूषेत महीलांसाठी हळदी कुंकू अशा आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी सरपंच सायली पाटील, ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, माजी सरपंच, पराग पाटोळे, संजय जाधव, माजी उपसरपंच अभिषेक नागावेकर उद्योजक संजय पटेल, मुकुंद ठक्कर उपस्थित होते. यावेळी परिसरातील नागरीकांनी दर्शनासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी गर्दी केली होती.

## ३७० दिवस ४२ किमी धावण्याचा विशाख कृष्ण स्वामीचा संकल्प



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवलीतील विशाख कृष्ण स्वामी हा धावपटू आता पर्यन्त धावण्याचे बरेच रेकॉर्ड त्याच्या नावावर आहेत. यावेळेस तो दररोज तो 42 किलोमीटर सलग 370 दिवस धावून जागतिक रेकॉर्ड पार करणार आहे.

विशाख कृष्णस्वामी हा एक सामान्य डोंबिवलीकर असून त्याला धावण्याचे वेड आहे. आता पर्यंत राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत त्याने अनेक रेकॉर्ड केलेत. मात्र आता त्याला यावेळेस एक मोठा जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करायचा आहे. तो दररोज 42 किलोमीटर सलग 370 दिवस धावणार आहे. 63 दिवस झाले असून वर्ल्ड रेकॉर्ड मुळे तो महाराष्ट्राचे आणि डोंबिवली चे नाव जगात मोठं करणार आहे ही त्याची जिद्द आहे. विशाख कृष्ण स्वामी हा एका सामान्य कुटुंबातला आहे. त्याला लहानपणापासून खेळाची जास्त आवड असल्यामुळे आता डोंबिवलीकर त्याला सपोर्ट करत आहेत.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत उत्कर्ष महाविद्यालयाची बाजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण (नरेंद्र पाटील) :** येथील उत्कर्ष महाविद्यालयातील विद्यार्थीनी योगिता वसंत वारघडे हिने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाला प्रथम क्रमांक मिळवून देत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे .



नवनीतभाई शाह परिवर्तन ट्रस्ट यांच्या वतीने सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर येथे मराठी विभागाअंतर्गत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रकल्प : संधी की संकट, अभिजात मराठी : आपली भुमिका या विषयावर स्पर्धा घेण्यात आलेल्या होत्या. तर या स्पर्धेमध्ये राज्यभरातील विविध महाविद्यालयांनी आपला सहभाग होता. या झालेल्या स्पर्धेत सहभागी झालेली उत्कर्ष महाविद्यालय वासिंद येथील बीए प्रथम वर्षात शिकत असलेली विद्यार्थिनी योगिता वसंत वारघडे हिने प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाला पहिला येण्याचा मान मिळवून दिला.

या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून डॉ. ज्ञानेश्वर भोसले, डॉ. अलका कदम, सुजाता यरकर, दै.नवाकाळ मुख्य उपसंपादक सुहास बिऱ्हाडे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. विवेक कडू यांनी केले. या मिळालेल्या यशामुळे समाज हितकारिणी संस्थेचे अध्यक्ष अरुण वारघडे, उपाध्यक्ष अनिल मानिवडे, सचिव रामदास शेळके, अंतर्गत हिशोब तपासणी विश्वास परटोले, सह खजिनदार भास्कर भोईर, सहसचिव अरुण भालेकर, सहसचिव दिनेश बोटकोंडले, प्राचार्य डॉ. शेषराव मसुडकर यांनी योगिता वारघडे हिचा उत्कर्ष महाविद्यालयाच्या वतीने सन्मान केला तसेच महाविद्यालय प्राध्यापक -प्राध्यापिका, कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिनंदन करुन कौतुक केले आहे.

# सिद्धीका-अर्जुनला राष्ट्रीय ॲथलेटिक्समध्ये रौप्य पदक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी स्पेशल ऑलिम्पिक नॅशनल ॲथलेटिक्स गेम्स मध्ये दैदीप्यमान यश मिळवून महाराष्ट्राचे नाव उंचावले असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

5 व 6 फेब्रुवारी 2026, रोजी



रोहतक, हरियाणा येथील स्पेशल ऑलिम्पिक भारत आयोजित नॅशनल ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडल्या. या नॅशनल स्पर्धामध्ये संपूर्ण देशातील 27 राज्यांमधील 510 दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धामध्ये सुहित जीवन ट्रस्ट, पेण येथील विद्यार्थीनी कु.सिद्धीका मंदार पाटील -100 मीटर धावणे रौप्य पदक तसेच जॅवलिंग थ्रो मध्ये रौप्य पदक पटकावले. तसेच कु.अर्जुन पांडुरंग वारे रनिंग लाँग जंप - रौप्य पदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**ही बाब केवळ संस्था व रायगड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी अत्यंत अभिमानाची आहे त्यामुळे अर्जुन व सिद्धिका यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे. या यशामागे या विद्यार्थ्यांचे पालक, संस्थेचे विश्वस्त प्रशिक्षक अमोल काईनकर तसेच आपण सर्व शुभचिंतक व हितचिंतक यांचा मोलाचा सहभाग आहे.**
**- सुरेखा पाटील ,सुहित जीवन ट्रस्ट अध्यक्षा**

## सेंट्रल रेल्वेच्या ढिसाळ व्यवस्थेमुळे प्रवाशांचे हाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रस्त्यावरील वाहतूक कोंडीतून सुटका होण्यासाठी बहुतांश चाकरमानी सेंट्रल रेल्वेच्या लोकलमधून प्रवास करतात, मात्र येथे ही रेल्वेच्या भोंगळ व अनागोंदी कारभाराचा त्रास प्रवाशांना भोगावा लागत आहे. याकडे लक्ष द्यायला कोणालाही वेळ मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कसारा, खोपोली दरम्यान सुमारे१८००च्या वर फे-या चालविल्या जातात, यामध्ये १२ व १५ डब्याच्या लोकलचा समावेश असून जलद व धिम्या सेवा सह ६ ऐसी लोकलचाही




समावेश आहे.

केवळ कसारा लाईनवर दिवसभरात१९/२०लोकल धावतात. या मार्गावरून दररोज१लाखाच्या आसपास प्रवासी, चाकरमानी प्रवास करतात, मात्र त्यांच्या सोईसुविधाची पूरती बोंबाबोंब असते, उशीरा गाड्या हे तर याभागाचे कायमचे दुखणे बनले आहे. आजचच उदाहरण द्यायचे झाले तर वाशिंद स्टेशनवर इंडिकेटरवर ३:२४ची गाडी असे दिसत होते, परंतु प्रत्यक्षात गाडी आली३:३४वाजता,हे कमी की काय, डब्यातील इंडिकेटर वर खडवली स्टेशन आले तर पुढील स्टेशन टिटवाळा, अशी चुकिची माहिती प्रसारित केली जात होती. टिटवाळा स्टेशन आले तर पुढील शहाड स्टेशन सोडून कल्याण सांगितले व प्रसारित केले जात होते, यामुळे प्रवाशांची गोंधळ, तारांबळ उडत होती. अशा प्रकारे सेंट्रल रेल्वेच्या भोंगळ व अनागोंदी कारभायाचा प्रवाशांना फटका बसून मनस्ताप सहन करावा लागत होता.

## ममता परदेशी यांचा ऐतिहासिक सायकलिंग जागतिक विक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आदी कैलास व ओम पर्वत या अतिदुर्गम आणि आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या स्थळांपर्यंत पहिली महिला सोलो सेल्फ सपोर्ट सायकल मोहिम यशस्वीरीत्या पूर्ण करून डोंबिवलीच्या ममता परदेशी यांनी ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. ही मोहिम २३ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पार पडली.

या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत ओएमजी बुक ऑफ रेकॉर्डकडून



या विक्रमाची अधिकृत नोंद करण्यात आली. त्यानिमित्ताने डोंबिवली येथील सिद्धिविनायक हॉल येथे आयोजित सुसंस्कार क्लासेसच्या कार्यक्रमात ममता परदेशी यांना सन्मानित करण्यात आले. ओएमजी बुक ऑफ रेकॉर्डचे सीईओ दिनेश गुप्ता यांच्या हस्ते सन्मानपत्र व पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सायकलिंग मोहिमेत ममता परदेशी यांनी अत्यंत कठीण भौगोलिक परिस्थिती, उंच पर्वतीय मार्ग, बदलते हवामान आणि दीर्घ अंतरांचा सामना करत ही कामगिरी यशस्वी केली. त्यांच्या या विक्रमामुळे महिला सायकलिंग, साहसी क्रीडा तसेच प्रेरणादायी सामाजिक उपक्रमांना नवी प्रेरणा मिळाली असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास सुसंस्कार क्लासेसचे पदाधिकारी, क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, सायकलिंगप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024